# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 03/01/2022 (सोमवार)

(सकाळ)

---

### खून

पो.स्टे. कळमेश्वर :— अंतर्गत 15 कि. मी अंतरावर मौजा मोहपा गडबरडी येथे दिनांक 03/01/22 चे 08.45 वा. दरम्यान आरोपी नामे— शरद विठोबाजी गणोरकर वय 30 वर्ष रा. मोहपा गडबरडी याने घरगुती वादावरून त्याची बहीण नामे— सौ उज्वला अर्पित भोजणे, वय 32 वर्ष, रा. प्लॉट क्र 14 धनगौरी नगर, पिपला रोड धागे यांच्या बंगल्यासमोर नागपुर हीने त्याला वीट फेकुन मारल्याच्या रागावरून उज्वला हीच्या डोक्यावर बांबुने मारून तिचा खून केला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— अर्पित रामभाउ भोजणे, वय 42 वर्ष, रा. प्लट क्र. 14 धनगौरी नगर, पिपला रोड धागे यांच्या बंगल्यासमोर नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 302 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे. घटनास्थळी मा. पोलीस अधिक्षक विजयकुमार मगर यांनी भेट दिली असून त्यांच्या मार्गदशनाखाली पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक प्रविण मुंडे मो नं. 9970094709 हे करीत आहे.

### घरफोडी

पो.स्टे. देवलापार :— अंतर्गत 07 कि. मी. अंतरावरील पवनी येथे दिनांक 26/12/2021 चे 18.30 वा. ते 21.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे— प्रतिक अरूनकुमार गुप्ता, वय 26 वर्ष, रा. पवनी व त्यांचे नातेवाईक हे फिर्यादिचे लहान मुलीचे वाढदिवस कार्यक्रम असल्याने घराला कुलुप लावुन बाहेर गेले होते. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराचे वरील मजल्यावरील मागील दरवाजा उघडुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने नोकियॉ कंपनीचा साधा मोबाईल कि. 500/—रू., एक ऐरयटेल कंपनीचा मोबाईल कि. 4,000/रू., बेडरूम मधील बॅगमधील 8,000/—रू. नगदी, हॉलमध्ये ठेवलेल्या कॉलेज बॅग मधील नगदी 50,000/—रू., किराणा दुकानाचे काउंटर मधील नगदी 3,000/—रू., एक आयडीबिआय बॅकेचे एटीएम कार्ड व युनियन बॅकेचे कोरा चेकबुक व एक एटीएम कार्ड 00.रू असा एकुण 65,500/—रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले. तपासात आरोपी क्र. 1. विक्रम मिथीलेश माळी वय 22 वर्ष रा. मौदी व 2. वृषभ गजानन वरखडे वय 20 वर्ष रा. मौदी हे निष्पन्न झाल्याने यांना अटक करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. देवलापार येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री पुंजरवाड मो.न. 8668865203 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर